औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक २९.१२.९० रोजी झालेल्या ५७ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औ.मं |
| २. श्री. अरविंद महाजन | उपसभापती औ.मं |
| ३. श्री. आर. आर. कुलकर्णी<br>प्रभारी आयुक्त/नासिक | सदस्य |
| ४. श्री. द. मो. गोडघाटे<br>उपसंचालक नगररचना<br>औरंगाबाद. | सदस्य |

विषय क्र. १: दिनांक ३०.११.९० रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ५६ व्या बैठकीतील विषय क्र ३ व ठराव क्र. ३२२ वर चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी प्रश्न उपस्थित केला की, महात्माफुले ग्रंथालय या संस्थेला ग्रंथाल्याकरिता जागा देण्यासाठी म. न. पा. औरंगाबादच्या ना हरकत प्रमाणपत्राची काय आवश्यकता आहे. कारण ही जागा अद्यापही म. न. पा. औरंगाबादला हस्तांतरीत झालेली नाही.

उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, विकास नियंत्रण नियमाप्रमाणे १०% जागा ही खुली सोडलेली आहे. जर या जागेतूनच म. न. पा. चे ना हरकत प्रमाणपत्र न घेता महात्माफुले ग्रंथालयाकरिता जागा दिल्यास विकास नियंत्रण नियमाप्रमाणे १०% जागा उरणार नाही व त्यामुळे ही जागा म. न. पा. ताब्यात घेणार नाही.

विभागीय आयुक्त नासिक यांनी सूचना केली की, मंडळाच्या वसाहतीतील खुली जागाही म. न. पा. कडे त्वरीत हस्तांतरीत करावी.

ठराव क्र. ३२९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मंडळाच्या वसाहतीतील खुली जागा म. न. पा/न. प. स त्वरीत हस्तांतरीत कराव्यात.

. . .

ठराव क्र. ३३०
-----------

दिनांक ३०.११. ९० रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: औरंगाबाद मंडळाने, औरंगाबाद येथे स्टेशनरोड देवगिरी कॉलेजच्या जवळ बांधलेल्या ८४ उच्च उत्पन्न गटातील निवासी गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव क्र. ३३१
-----------

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, औरंगाबाद मंडळाने स्टेशनरोड औरंगाबाद येथे बांधलेल्या ८४ उच्च उत्पन्न गट गाळ्यापैकी शिल्लक असलेले तीन गाळे, सोडतीत समाविष्ट न केलेल्या तीन अर्जदारांना वाटप करण्यांत यावे.

विषय क्र. ३: परभणी येथील गुलशनाबाद/राहूलनगर व आंबेडकरनगर या झोपडपट्टतील सुधारणा कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

- - - - - - - - - - -   - - - - - - - -

ठराव क्र. ३३२
-----------

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, परभणी नगरपालिकेकडून परभणी येथील गुलशनाबाद/राहूलनगर व आंबेकडकरनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेसाठी अनुक्रमे रू. ८, ७९, ३९० व रू. १, ३९, ४७० चे प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाले आहेत.

परभणी जिल्हयासाठी १९९०-९१ वर्षात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी सुधारीत तरतुदी ७ लक्ष रूपयाची आहे. अद्यापपर्यन्त परभणी न.प. ने या कामावर १.१३ लक्ष रूपये खर्च केलेला असून ५.८७ लक्ष रू. शिल्लक आहे. न.प च्या हाती सध्या १.३७ लक्ष रूपयाची कामे बाकी आहेत. ही कामे पूर्ण होऊनही या वर्षीची संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकणार नाही. त्यामुळे संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने गुलशनाबाद/राहूलनगर व आंबेडकरनगर या झोपडपट्टीच्या सुधारणा कामाच्या प्रस्तावास अनुक्रमे रू. ३, ६२, २५०/- व रू. ५१, ३३२/- प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. परंतु परभणी न.प. च्या हाती असलेल्या १.३७ लक्ष रूपयाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

....

विषय क्र.४: करीमाबाद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांचे स.क्र. ४५ शहानुरवाडी, औरंगाबाद या जमिनीतून भूखंड मिळण्याबाबतचे अर्ज.

या प्रकरणी खालील प्रमाणे चर्चा करण्यांत यावी.

सर्वोच्च न्यायालयाने या संस्थेचा विशेष परवानगी अर्ज फेटाळुन लावतांना अशी सूचना केली आहे की, या संस्थेच्या सभासदांनी भूखंडासाठी अर्ज केले तर असा अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा.

या सुचनेचे यथायोग्य पालन व्हावे म्हणून या मंडळाने विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मत/मार्गदर्शन मागविले होते.

विधी सहाय्यक/प्रा. यांच्या मतप्रमाणे, मंडळाने त्या जमिनीवर राबविण्यात यावयाच्या गाळे वा भूखंडाच्या वाटपासाठी मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांप्रमाणे जाहिरात दिल्यानंतर त्यास अनुसरुन जर या संस्थेच्या सभासदाने अर्ज केला तर असा अर्ज सहानुभूतीपूर्वक विचारात घ्यावा. विधी सहाय्यक/प्राधिकरण यांनी पुढे असेही मत व्यक्त केले की, गाळ्यांच्या वाटपासाठी प्राधिकरणाने केलेल्या विनियमांचे पालन तंतोतंतपणे [ STRICTLY ] करण्यांत यावे तथापी या विनियमांचे तंतोतंतपणे पालन करतांना जर अशाही तांत्रिक अडचण [ TECHNICAL HITCH ]येत असेल तर त्यांच्या अर्ज सहानुभूतीपूर्वक विचारात घेण्यांत यावा.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येण्यापूर्वीच या मंडळाने त्या जमिनी-वर १५० गाळे अल्प उत्पन्न व ४३ गाळे उच्च उत्पन्न गट या योजना तयार केल्या होत्या.

त्यास अनुसरुन मंडळाने मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांप्रमाणे या गाळ्यांच्या वाटपासाठी दि.२१.८.९० ते २१.९.९० या मुदतीत अर्ज मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिली होती.

या जाहिरातीस अनुसरुन विहित मुदतीत ८७१ इतके अर्ज अल्प उत्पन्न गट गाळ्यांसाठी तर ७७ इतके अर्ज उच्च उत्पन्न गट गाळ्यांसाठी मंडळाकडे आले. तथापी त्यात सदर संस्थेच्या सभासदांचे अर्ज नव्हते.

याउलट संस्थेने जाहिरात अवैध ठरविणेसाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर औरंगाबाद यांचे न्यायालयात दिवाणी दावा क्र.१०५५/९० दाखल करुन तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी अर्ज दिला. तथापी मंडळाने न्यायालयात उपस्थित होऊन आपले म्हणणे मांडल्यावर न्यायालयाने तो अर्ज फेटाळुन लावला.

मध्यंतरीच्या काळात, मंडळाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे सुकर व्हावे म्हणून विधी सहाय्यक/प्रा. यांचे मार्गदर्शन मागविले होते. विधी सहाय्यक/प्रा. यांनी दि.१६.३.९० च्या पत्राद्वारे असे कळविले की, सर्वोच्च न्यायालयाच्या या सुचनावजा आदेशानुसार जेंव्हा औरंगाबाद मंडळ या जमिनीवरील गाळे/भूखंडासाठी प्राधिकरणाच्या मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमाप्रमाणे जाहिरात देईल त्यास अनुसरुन जर या संस्थेच्या सदस्यांनी गाळा वा भूखंडासाठी अर्ज केला तर अर्ज सहानुभूतीपूर्वक विचारात घ्यावा.

विचारात घ्यावा.

त्यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे आणि अशा प्रकारे मिळकत व्यवस्थापक विषयक विनियमांचे काटेकोरपणे पालन केल्यानंतर जर कांही तांत्रिक अडचण [ TECHNICAL HITCH ] येत असेल तर अशा अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा.

परंतु या संस्थेच्या सभासदांनी वर उल्लेखिलेल्या, गाळे वाटपासाठी या मंडळाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन, विहीत नमुन्यात व विहित मुदतीत आपले अर्ज सादर केले नाहीत. त्यामुळे विधी सहाय्यक/प्रा. यांचे मार्गदर्शनानुसार अशा अर्जाचा विचार करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

आता दिनांक १४/११/९० रोजी या संस्थेच्या सभासदांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार २००० ते ३००० चौ. फुटाचे भूखंड मिळण्यासाठी मंडळाकडे अर्ज सादर केले आहेत.

मुख्य अधिकारी/औ. मं यांनी सदरचे अर्ज तपासण्यास्तव मिळकत व्यवस्थापक/औ. मं. यांचेकडे पाठविले. तथापी जाहिरातीस अनुसरुन विहीत नमुन्यामध्ये व विहीत मुदतीत सदरचे अर्ज आलेले नसल्यामुळे व योजना गाळ्यासाठीची असतांनाही अर्ज भूखंडासाठी असल्यामुळे त्यांना प्रचलित विनियमाच्या चौकटीत त्या अर्जावर निर्णय घेणे शक्य होऊ शकले नाही म्हणून मुख्य अधिकारी यांनी सदर अर्ज सहानुभूतीपूर्वक विचारार्थ मंडळापुढे ठेवलेत.

अर्थात विधी सल्लागार/प्रा. यांच्या मार्गदर्शनानुसार व अन्यथाही, या मंडळास, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ व तदंतर्गत तयार करण्यांत आलेल्या नियम व विनियमांच्या चौकटीतच निर्णय घेणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणांत या संस्थेच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करतांना खालील मुद्दे [ POINTS ] उद्भवतात.

१] या संस्थेच्या सभासदांचे अर्ज गाळ्यांसाठीच्या जाहिरातीस अनुसरुन करण्यांत आलेले नाही.

२] सदर अर्ज मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांद्वारे विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यात नाहीत.

३] हे अर्ज जाहिरातीत देण्यांत आलेल्या मुदतीत सादर करण्यांत आले नाहीत.

४] त्या सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसून आवश्यक त्या रकमेचा भरणा केलेला नाही.

५] या जमिनीवर गाळ्यांची योजना राबविण्यांत येणार असून त्याप्रमाणे सर्वसामान्य जनतेकडून [राखीव प्रवर्ग धरुन] मोठ्या प्रमाणावर अर्ज आलेले असून सदर संस्थेच्या सभासदांचे अर्ज मात्र भूखंडासाठीचे आहेत.

६] या संस्थेच्या सभासदांच्या मागणीनुसार प्रत्येकी २००० चौ. फुटाचे भूखंड द्यावयाचे ठरविले तर संस्थेची सभासद संख्या पाहता संस्थेची पूर्ण ३ अेकर इतकी जमिन संस्थेला परत करावी लागेल व मंडळास घोषित केलेली योजना राबविणे शक्य होणार नाही.

या मंडळास सदर संस्थेबद्दल पूर्ण सहानुभूती आहे. तथापी वरील सर्व मुद्यांचा, प्रचलीत नियम व विनियम यांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार केला तरीही या मंडळाला वर सविस्तर नमुद केलेल्या कारणास्तव या संस्थेच्या सभासदांना, त्यांच्या मागणी प्रमाणे स.क्र. ४५ औरंगाबाद या जमिनीतून भूखंड देणे शक्य होणार नाही.

ठराव क्र. ३३३

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, " करीमाबाद सह. गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांच्या स.क्र. ४५ शहानुरवाडी औरंगाबाद या जमिनीतून प्रत्येकी २००० ते ३००० चौ. फुट क्षेत्रफळाच्या भूखंड देण्याची, मागणी या मंडळास मान्य करता येणे शक्य नसल्यामुळे हे मंडळ त्यांचे अर्ज नामंजूर करीत आहे.

सदर संस्थेच्या सभासदांना त्याप्रमाणे कळविण्यांत यावे ".

विषय क्र. ५ असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपूर्तीकरणेबाबत.

ठराव क्र. ३३४

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. एल. एस. चौधरी यांनी त्यांचा अपघात झाल्याने त्यासाठी आलेला खर्च हा प्राधिकरणाच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मार्गदर्शक तत्वानुसार असल्याने केलेला खर्च प्राधिकरणाच्या नियमानुसार पडताळून व प्रमाणीत करुन घेऊन अदा करण्यास मान्यता दिली.

विषय क्र. ६: विशेष नियोजन प्राधिकरण वाळुज.

प्रसिध्द झालेल्या आराखडयावरील सूचना मंडळामार्फत नियोजन समितीपुढे विचारार्थ ठेवण्याबाबत.

ठराव क्र. ३३५

हा विषय वगळण्याचा निर्णय मंडळाने घेतला.

विषय क्र. ७: वर्ष ९०-९१ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि वर्ष ९१-९२ चे प्रस्तावित अंदाजपत्रक.

ठराव क्र. ३३६

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने वर्ष १९९०-९१ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि वर्ष १९९१-९२ चे प्रस्तावित अंदाजपत्रकास मान्यता दिली.

विषय क्र.८: मा.सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र.१: औरंगाबाद महानगरपालिका व धुळे, जळगांव नगरपालिकेकडून आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

ठराव क्र.३३७

औरंगाबाद महानगरपालिकेने मोचीवाडा या झोपडपट्टी सुधार कामांना, प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून रु. ४, २२,७५५ चे अंदाजपत्रक पाठविले आहे.

औरंगाबाद जिल्हयासाठी १९९०-९१ वर्षात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी सुधारीत तरतुद ७.०१ लक्ष रुपयाची आहे. आतापर्यन्त म.न.पा.या या कामावरी खर्च ४.०१ लक्ष रुपये झाला असून शिल्लक ३.०० लक्ष रुपये आहे. म.न.पा. च्या हाती सध्या ४.३७ लक्ष रुपयाची कामे आहेत. चालु आर्थिक वर्षातील संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने तसेच पुढील आर्थिक वर्षात म.न.पा. च्या हाती कामे असण्याच्या दृष्टीने शिल्लक तरतुदीच्या दुप्पटीपर्यन्त रकमेची कामे म.न.पा. च्या हाती असणे आवश्यक असल्याने प्रस्तावित ३,००,६७०/- रुपयाच्या योजनेस प्रशासकीय मान्यता ही म.न.पा.च्या हाती असलेल्या ४.३७ लक्ष रुपयाची कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर देण्यांत येत आहे.

ठराव क्र.३३८

धुळे:

धुळे न.प.ने देवपूर चिट्टाभट्टी स.न.३२ व देवपूर चिटाभट्टी स.न.२९ ब, या दोन झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता मिळावीम्हणून अनुक्रमे रु. २२४०४७/- व रु. १,३४,०५२/- रुपयाचे अंदाजपत्रके पाठविले आहे.

धुळे शहरासाठी ९०-९१ वर्षात " झोपडपट्टी सुधारणा" कार्यक्रमासाठी सुधारीत तरतुद १.५० लक्ष रुपयाची आहे. अद्याप पर्यन्त धुळे न.प. वा या कामावरील खर्च निरंक असून संपूर्ण तरतुद शिल्लक आहे धुळे न.प. च्या हाती सध्या ०.५९ लक्ष रुपयाची कामे आहेत ही कामे पूर्ण होऊनही या वर्षाची संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकणार नाही. त्यामुळे संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने वरील प्रस्तावास अनुक्रमे रु. १,४२,०१५/- व रु. ७४,१७५/- खर्चास धुळे न.प. च्या हाती शिल्लक असलेल्या कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

ठराव क्र.३३९

जळगांव

जळगांव नगरपालिकेने गोपालपूरा या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी सुधारणा कामाची अंदाजपत्रके रु. १,७६,९४५/- रुपयाचे प्रस्ताव पाठविले आहे.

जळगांव जिल्ह्यासाठी ९०-९१ वर्षात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी सुधारीत तरतुद रु. ८.५२ लक्ष रुपयाची आहे. आतापर्यन्त नगरपालिकेचा या कामावरील खर्च रु. ३. ५१ लक्ष झाला असून शिल्लक ६.०१ लक्ष रुपये आहेत. नगरपालिकेच्या हाती सध्या ५.७७ लक्ष रुपयाची कामे आहेत. ही कामे पूर्ण होऊनही संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकणार नाही. त्यामुळे संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने, जळगांव नगरपालिकेच्या हाती असलेल्या ५.७७ लक्ष रुपयांच्या कामांना प्राधान्य देण्याच्या अटीवर "गोपालपूरा" या झोपडपट्टीच्या सुधारणा कामाच्या प्रस्तावास रु. १,१६,९९८ रु. नियमानुसार प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

विषय क्र२: औरंगाबाद मंडळाचे स्टेशनरोड, देवगिरी कॉलेजच्या जवळील दुकान क्रमांक १६ बाबत.

ठराव क्र. ३४०

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. सावंत हे सुशिक्षित बेकार असल्याने व स्वावलंबी व्हावे म्हणून त्याने दुकान मिळण्यासाठी निविदा दिली होती. मात्र त्यांची आई जी ७० वर्षाची विधवाबाई आहे ती अचानक सिरीयस झाल्यामुळे ते दिलेल्या मुदतीत पैसे भरु शकले नाही. त्यामुळे दुकान क्र. १६ साठी भरलेले रु. १०,००० मंडळाला आलेला खर्च वजा जाता परत करण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करुन प्राधिकरणास कळवावे.

विषय क्र.३: शिवाजीराव पाटील निलंगेकर" सहकारी साखर कारखाना अंबुलगा [बु] ता. निलंग जि. लातूर येथील कर्मचा-यासाठी गृहनिर्माण योजना.

ठराव क्र. ३४१

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखान्याने त्यांच्या कर्मचा-यासाठी २४७ घरांची गृहनिर्माण योजना राबविण्याची विनंती केलेली आहे. परंतु गृहनिर्माणाचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे खालील अटींसह मान्यतेस्तव पाठविण्यात यावा व शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखान्यास खालील अटी कळवून त्या अटी त्यांना मान्य असल्याबाबत त्यांच्याकडून सहमती घ्यावी.

१] साखर कारखान्याने योजनेची जमिन प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावी.

२] लाभधारकांची पात्रता ही प्राधिकरणाच्या नियमानुसार मंडळ निश्चित करेल.

३] जमिनीची किंमत शासकीय धोरणाप्रमाणे संबंधीत खात्याकडून निश्चित करण्यांत येईल व कारखान्याच्या प्रस्तावाप्रमाणे सुरुवातीस भरावयाची रक्कम जमिनीच्या किंमतीपोटी वळती करण्याऐवजी तिची किंमत प्रकल्पाच्या किंमतीत धरण्यांतयेईल.

..८

४] योजने अंतर्गत बाहयसुविधा पुरविण्याची जसे रस्ते, पाणी, ड्रेनेज वीज इत्यादी जबाबदारी साखर कारखान्याने घ्यावी व गाळे वाटप झाल्यावर त्याची देखभाल कारखान्यासच करावी लागेल.

५] गृहनिर्माण योजनेकरिता उपलब्ध होणा-या कर्जाची हमी साखर कारखान्याने राष्ट्रीयकृत बँकेची सादर करावी अथवा मालमत्ता तारण ठेवावी.

६] योजना पूर्ण झाल्यावर लाभधारकांनी काही कारणामुळे गाळे ताब्यात घेण्यास नकार दिल्यास सर्व गाळे साखर कारखान्याने घ्यावेत व परतफेडीचे हप्ते भरावेत.

७] साखर कारखान्याने गाळेधारकांकडून कर्जाच्या परतफेडीचे हप्ते नियमित वसुल करून मंडळाकडे जमा करावेत.

८] कर्जाचे संपूर्ण हप्ते फिटेपर्यन्त योजनेची जमिन प्राधिकरणाच्या नांवावर राहील.

९] गाळयांची किंमत व उपलब्ध होणारे कर्ज यामधील फरकाची रक्कम गाळेधारकांना भरावी लागेल.

कारखाना जर सदर गृहनिर्माण योजना राबविणार असल्यास योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३% सेवाशुल्क म्हणून मंडळास द्यावे लागतील.

बैठकीनंतर मा. सभापतींचे आभार मानून सभा संपली.